30 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहरात पाच दिवसांत १६ लाख लिटर पाणीपुरवठा

**कोल्हापूर, ता. २९ :** महापूरग्रस्त कोल्हापूरकरांची तहान भागविण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे पाच दिवसांत १६ लाख लिटरचा पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्रातून करण्यात आला. त्याचप्रमाणे रोज पाच ट्रॉली इतके गवतही जनावरांच्या चाऱ्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

कोल्हापूरला पाणीपुरवठा करणारी सर्व जलशुद्धीकरण केंद्रे पुराच्या पाण्याखाली गेल्याने शहर व परिसराला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली. महानगरपालिकेच्या यंत्रणेद्वारे विद्यापीठाच्या जल शुद्धीकरण केंद्रांमधून टँकरने शहराला पुरविण्यात येत आहे. विद्यापीठाच्या एका जल शुद्धीकरण केंद्रावर येणारा ताण लक्षात घेऊन क्रीडा विभागाकडील विहिरीच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातील संशोधकांमार्फत पाण्याची नमुना



तपासणी करण्यात आली. पाणी पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा प्राप्त झाल्यानंतर त्या विहिरीतील पाण्याचा उपसा सुरवात करण्यात आली. यामुळे दोन केंद्रांमधून आणखी गतीने पाणी पुरविणे शक्य होऊ लागले आहे. अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी उपकुलसचिव आर. पी. यादव आणि त्यांचे सर्व सहकारी याचे नियोजन करत आहेत. परिसरातील काही राखीव कुरणांवरील गवत काढण्यास चारा छावण्या व गरजू नागरिकांना परवानगी देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021
लोकमत

# विद्यापीठाने पाच दिवसांत पुरविले १६ लाख लीटर पाणी

## मदतीचा हात : जनावरांसाठी २५ ट्रॉली गवत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महापुराच्या स्थितीत कोल्हापूरकरांना पाणी पुरविण्याच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने मदतीचा हात दिला. गेल्या पाच दिवसांत रोज सरासरी सव्वा तीन लाख लीटर या प्रमाणे १६ लाख लीटरचा पाणीपुरवठा विद्यापीठातील जलशुद्धीकरण केंद्रामधून केला आहे. रोज पाच ट्रॉली गवतही जनावरांच्या चाऱ्यासाठी उपलब्ध करून दिले.

महानगरपालिकेच्या यंत्रणेद्वारे विद्यापीठातून टँकरने शहराला पाणी पुरविण्यात आले. विद्यापीठाच्या एका जल शुद्धीकरण केंद्रावर येणारा ताण लक्षात घेऊन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील विहिरीचे पाणीही उचलण्यास सुरूवात केली. त्याचे नियोजन अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी उपकुलसचिव आर.पी. यादव आणि त्यांचे सर्व सहकारी करत आहेत. दरम्यान, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, यांनी क्रीडा अधिविभागाकडील विहिरीमधून येणाऱ्या पाणीपुरवठ्याची पाहणी बुधवारी केली.

### असे पुरविले पाणी (लीटरमध्ये)

- रविवारी : २ लाख ७० हजार
- सोमवारी : ३ लाख १८ हजार
- मंगळवारी : ३ लाख २७ हजार
- बुधवारी : २ लाख ७६ हजार
- गुरूवारी : ४ लाख २५ हजार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021

पुढारी

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यपदी डॉ. रणधीर शिंदे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून मराठीतील लेखक, समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. शिंदे हे २००५ पासून प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठ मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख म्हणून ते गेल्या दोन वर्षांपासून जबाबदारी सांभाळत आहेत. यापूर्वी त्यांनी कुंडल (जि. सांगली) येथील जी. डी. बापू लाड महाविद्यालयात पाच वर्षे अध्यापनाचे काम केले आहे. त्यांची पाच पुस्तके स्वतंत्र प्रकाशित झाली आहेत. त्यांनी दहा पुस्तके संपादित केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
30 JUL 2021
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विवेकानंद'ला सर्वसाधारण विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल संकेतस्थळावर उपलब्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. या महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेजने पटकावले असून, माजी कुलगुरु स्व. आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक विवेकानंदने पटकावला आहे. या महोत्सवाचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रातून विवेकानंद कॉलेजवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय युवा महोत्सव पार पडला. या महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांचा समावेश मध्यवर्ती युवा महोत्सवात करण्यात आला होता. मध्यवर्ती युवा महोत्सव सहभागी झालेल्या सर्वच स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देवून गौरवण्यात येणार आहे.



विभागवार विजेतेपद चषक व सर्वसाधारण विजेतेपद चषक प्राप्त महाविद्यालयांना प्रदान कार्यक्रम सवडीने आयोजित केला जाणार आहे. वक्तृत्व, सुगम गायन, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकल गायन, शास्त्रीय सुरवाद्य, शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य एकल वाद्यवादन, शास्त्रीय नृत्य, नकला, एकपात्री अभिनय, व्यंगचित्र, भित्तीचित्र, स्थळचित्र, कातरकाम, मातीकाम, रांगोळी, मेहंदी या कलाप्रकाराचा समावेश होता. मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची नोंद सहभागी स्पर्धकांनी घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021
पुढारी

# ग्रामविकासाच्या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी : डॉ. प्रसाद दावणे

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : ग्रामविकासविषयक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शासनासह खासगी क्षेत्रातही अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. प्रसाद दावणे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्यामार्फत 'ग्रामीण अभ्यासक्रमातील रोजगाराच्या संधी' या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. दावणे यांनी सरकारी, निमसरकारी, खासगी, बँकिंग, सहकार क्षेत्र, महानगरपालिका, विविध खासगी कंपन्या अशा विविध क्षेत्रांमध्ये ग्रामविकास अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या रोजगारविषयक संधींचे विवेचन केले. डॉ. पवार यांनी ग्रामविकास अभ्यासक्रमाची माहिती दिली. यावेळी सहायक प्रा. डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे यांनी मास्टर ऑफ रूरल स्टडीज या अभ्यासक्रमाची माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021
पुढारी

# अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे इतर शुल्क परत देण्याचा निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांतील अंतिम वर्ष अंतिम सत्राचे विद्यार्थी सोडून शैक्षणिक व परीक्षा शुल्क वगळून इतर शुल्क त्या विद्यार्थ्यांना परत देणे व प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे इतर शुल्क पुढील वर्षाच्या सत्रात समाविष्ट करण्यास व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक गुरुवारी कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. डीओटीसह इतर विभागांतील प्राध्यापक भरती विद्यापीठ फंडातून करण्यास मान्यता देण्यात आली. विक्री, बांधकाम आदी समितीच्या कामकाजाबाबत चर्चा झाली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.